**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ... अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२१ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.एस.एम.हेरवाडे
तत्कालीन श्री.पी.बी.बिचकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे राजाळे, ता.फलटण येथील जमीन ग.नं.७०२ बाबत क्रि.प्रो.कोड कलम १४५ खाली चॅप्टर केस नं.१/२००० मधील वादग्रस्त मिळकत रिसीव्हर यांच्या ताब्यात दिली. सदर जमिनीचा ताबा आजतागायत का दिला नाही याची माहिती मिळावी. | |

## विवेचन

मौजे राजाळे, ता.फलटण येथील जमीन ग.नं.७०१ बाबत फौजदारी संहिता कलम १४५ खाली चॅप्टर केस नं.१/२००१ मधील वादग्रस्त मिळकत रिसीव्हर यांच्या ताब्यात दिली. त्या जमिनीचा ताबा आजतागायत का दिला नाही, अशी माहिती ॲड.दौलत वि.मोरे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांच्याकडे मागितली होती. त्या अनुषंगाने शासकीय कार्यपध्दती व कारवाई याबद्दल खुलासा विचारणारी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली असूनही आपण ती त्यांना विहित मुदतीत दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण श्री.एस.एम.हेरवाडे यांनी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. न्यायालयीन निर्णयानुसार ॲड.मोरे यांच्या अर्जाबाबत वेळोवेळी कार्यवाही केली आहे. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाबाबतचे भाष्य वा अन्वयार्थ ॲड.मोरे 'माहिती' म्हणून मागत असून ते देणे शक्य नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांनी आयोगापुढे लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला दिलेली माहिती अयोग्य आहे, जमीन कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात असल्याचे माहिती-मागणीच्या अर्जावर कळविण्यत आले होते. त्यामुळे गट नं.७०१/१ व ७०१/२ या जमिनीवर फेरफार नोंद करुन कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात असल्याबाबतचा शेरा कमी का केला, ही माहिती आपल्याला मिळाली नाही, असे ॲड.मोरे यांनी दि.१०.१२.२००७ रोजी आयोगाला

सादर केलेल्या निवेदनात म्हटले असून तेच आपले म्हणणे असल्याचे दि.२१.५.२००८ च्या पत्रात पुन्हा नमूद केले आहे.

संबंधित विषय प्रदीर्घ काळ चाललेल्या न्यायालयीन वादाशी निगडित आहे. त्यातील निर्णयाबाबतचा अन्वयार्थ व भाष्य याचा माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ मध्ये विषद केलेल्या 'माहिती'मध्ये समावेश होत नाही. अन्य माहिती अॅड.भोरे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.८.२००८

ऑगस्ट-०८/८८-९०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१) श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
रा.ओंकार, ३१-अंजली कॉलनी, गेंडामाळ,
शाहुपुरी, सातारा

(२) श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे (अपील क्र.११४+११६)
रा.मु.पो.लोणंद(विठ्ठल मंदिरासमोर), ता.खंडाळा, जि.सातारा

(३) श्री.दत्तात्रय मनोहर पाटील (अपील क्र.१६५)
रा.शासकीय दूध योजना, सातारा
सी-३, एम.आय.डी.सी.एरिया, सातारा ४१५५०३

(४) श्री.गोरखनाथ चंदू मोरे (अपीलक क्र.१०९+१७६)
रा.शासकीय निवासस्थान, क, एच-१,
शासकीय दूध योजना, सातारा,
सी-३, एम.आय.डी.सी.एरिया, सातारा ४१५५०३ अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
पुणे, जि.पुणे उत्तरवादी

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त प्रशासन,
आयुक्त, दुग्धविकास यांचे कार्यालय, वरळी, मुंबई-४०००१८

(१)**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक, शासकीय, दुग्ध योजना, पुणे

(२) **जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, पुणे

(३) **जन माहिती अधिकारी** तथा दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना,
एम.आय.डी.सी., सातारा

(४)**जन माहिती अधिकारी** तथा जनसंपर्क अधिकारी, आयुक्त कार्यालय, दुग्धविकास विभाग,
वरळी, मुंबई-४०००१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३+७६+४०+१६७+१७४+११५+ १४७+१८२+७८+८१+११४+११६+ १६५+१०९+१७६/ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.२.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता**

(१) श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
रा.ओंकार, ३१-अंजली कॉलनी,
गेंडामाळ, शाहुपुरी, सातारा

(२) श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे
रा.मु.पो.लोणंद(विठ्ठल मंदिरासमोर),
ता.खंडाळा, जि.सातारा

(३) श्री.गोरखनाथ चंदू मोरे (अपीलक क्र.१०९+१७६)
रा.शासकीय निवासस्थान, क, एच-१,
शासकीय दूध योजना, सातारा,
सी-३, एम.आय.डी.सी.एरिया, सातारा ४१५५०३

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे श्री.ज.अ.चौगुले

(१)**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक, शासकीय, दुग्ध योजना, पुणे श्री.ज.अ.चौगुले

(२) **जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, पुणे श्री.एम.एस.माळगे

(३) जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना,
एम.आय.डी.सी.सातारा श्री.ह.य.नलवडे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५३/सातारा / २००६ | १२.१०.२००६ | -- | १३.११.२००६ | १.१२.२००६ |
| ७६/ सातारा / २००७ | ३०.११.२००६ | -- | २२.१.२००७ | ५.२.२००७ |
| ४० / सातारा / २००७ | ५.१२.२००६ | -- | २२.१.२००७ | २६.१.२००७ |
| १६७/ सातारा / २००६ | १८.३.२००६ | -- | २८.४.२००६ | १२.५.२००६ |
| १७४/ सातारा / २००६ | २३.३.२००६ | -- | २४.८.२००६ | -- |
| ११५ / सातारा / २००६ | ४.७.२००६ | २.८.२००६ | ४.९.२००६ | १८.९.२००६ |
| १४७/ सातारा / २००६ | ३.११.२००६ | १.१२.२००६ | ४.११.२००६ | ११.१२.२००६ |
| १८२ / सातारा / २००६ | २१.७.२००६ | १७.८.२००६ | ५.९.२००६ | १८.९.२००६ |
| ७८ / सातारा / २००७ | ५.३.२००७ | -- | -- | १६.१२.२००६ |
| ८१ / सातारा / २००७ | २१.७.२००६ | -- | -- | डिसेंबर २००६ |
| ११४ / सातारा / २००६ | १८.३.२००६ | -- | ५.६.२००६ | ३.७.२००६ |
| ११६ / सातारा / २००६ | १८.३.२००६ | -- | ५.६.२००६ | ३.७.२००६ |
| १६५ / सातारा / २००६ | २४.१०.२००५ | -- | १२.१.२००६ | -- |
| १०९ / सातारा / २००६ | २७.२.२००६ | ६.७.२००६ | २१.४.२००६ | -- |
| १७६/ सातारा / २००६ | २३.११.२००६ | -- | १९.४.२००६ | १२.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.१६५**

दि.२४.७.२००१ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.२३.५.१९७६ पासून पूर्वलक्षी प्रभावाची पुन:पदस्थापना 'सहा.दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ' या पदी स्थायीकरण करणेस, तसेच त्यानुसार माझी सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चिती होऊन देय फरक मिळण्यास व तद्अनुषंगाने अन्य लाभ मिळण्यास मी हक्कदार असूनही अद्यापी याबाबत मी वंचित राहिलो आहे.

**अपील क्र.७६+१६७+७८+८१**

(१)श्री.शेख यांना वेतन फरक व सेवानिवृत्तीचा फरक अदा केलेल्या बिलांची छायांकित प्रत.(अ.क्र.७६)

(२)वित्त विभागाने दि.१.४.१९७८ च्या शासन अधिसूचनेअन्वये वेतनश्रेणी लागू केलेल्या दि.२३.१२.२००२ च्या शुध्दीपत्रकाची प्रत. श्री.मोरे, श्री.चव्हाण यांना मूळ नियुक्तीच्या पदाची पूर्वलक्षी प्रभावाच्या पुन:पदस्थापनेची दि.२३.१२.२००२ च्या शुध्दीपत्रकाची प्रत.(अ.क्र.१६७)

(३)मा.राज्यमंत्री, मुख्यमंत्री, मुख्य सचीव, प्रधान सचीव(पदुम) यांनी माझ्या दि.१४.६.२००४ च्या अर्जावर मारलेल्या शेऱ्याची प्रत.

(४)ज्यांचे शिक्षण कृषी पदवीधर आहे असे गुणनियंत्रण आणि दुग्धतंत्रज्ञ व व्यवस्थापन गटात प्रथम नियुक्ती प्रयोगशाळा सहाय्यक किंवा दुगधशाळा रसायन शास्त्रज्ञ, दिली गेली आहे त्यांची नांवे, पदनाम व सध्याची आस्थापना.

(५)ज्यांचे शिक्षण आयडीडी(डीटी)आहे त्यांची मूळ नियुक्ती दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ म्हणून केली आहे, तसेच दुग्धशाळा पर्यवेक्षक म्हणून केलेली आहे, तसेच ज्यांची मूळ नियुक्ती दुग्धतंत्री व व्यवस्थापन गटातील आहे अशा कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार किंवा प्रशासकीय कारणासाठी गुणनियंत्रण पदावर कार्यरत ठेवलेले आहे अशा कर्मचाऱ्यांची नांवे, सध्याचे पदनाम व आस्थापना. तसेच सेवाप्रवेश नियम डावलून, मूळची गुणनियंत्रण विभागातील नेमणूक आहे अशा कर्मचाऱ्यांना दुग्धतंत्रज्ञ व व्यवस्थापन गटातील पदावर कार्यरत ठेवलेले आहे अशा कर्मचाऱ्यांची नांवे व पदनाम, सध्याची आस्थापना.

**अपील क्र.१०९+१७६+४०+१७४**

(१)दि.११.३.१९७६ ते दि.२९.८.१९७९ पर्यंत मिरज दूध योजना येथे काम केलेल्या काळाचे 'न देय' प्रमाणपत्र, श्री.काटे, सेवानिवृत्त मुख्य लिपीक व श्री.जाधव वरिष्ठ सहाय्यक यांनी औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे दाखल केलेल्या व जिंकलेल्या दाव्याची निकालासह सर्व कागदपत्रे. (२)दि.११.३.१९७६ ते दि.३०.८.१९७९ पर्यंतच्या कालावधीची पूर्वलक्षी प्रभावाची वर्ग-३ मधील कर्मचारी म्हणून पुन:पदस्थापना केलेल्या दि.२३.१२.२००२ च्या आदेशाची सुधारित प्रत, त्याप्रमाणे वेतननिश्चिती करुन आदेशाची प्रत. (३)शासकीय दूध योजना, सातारा यांच्या शिफारशीच्या पत्रानुसार दुग्धप्रेषकांच्या एकत्रित यादीत ज्येष्ठता पूर्वलक्षी प्रभावाने दर्शविलेल्या

सुधारित ज्येष्ठता यादीची प्रत. श्री.मोरे यांना मंडल निरीक्षक या पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी कार्यकारी गटातून दिलेल्या शुध्दीआदेशाची प्रत.

**अपील क्र.११५+१४७**

(१)श्री.वाडेकर यांचे पदावर श्री.बोकील यांची बदली करण्यात आलेल्या आदेशास न्यायालयात आव्हान दिलेले असल्यामुळे झालेल्या सर्व पत्रव्यवहाराची माहिती, बारनिशीमध्ये नोंदविलेल्या आवक/जावक क्रमांकासह .(२)तक्रार युएलपी४८/२००६, दि.९.६.२००६ प्रमाणे जैसे थे स्थिती ठेवण्याचे औद्योगिक न्यायालय, सातारा यांचे आदेश होते. असे असताना मला रुजू करुन घेण्यात आले नाही, तो निर्णय वरिष्ठ स्तरावर का कळविला नाही, तो स्वत:चा निर्णय होता का, श्री.बोकील यांनी पदाचा धारणाधिकार रिक्त का ठेवला नाही, कोर्टाच्या आदेशानुसार मला कामावर हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाहीची अंमलबजावणी घरपोच का केली नाही.

**अपील क्र.५३+१८२**

श्री.एस.डी.पवार, दुग्ध प्रेषक, शासकीय दूध योजना, पुणे यांच्या मूळ नियुक्तीच्या दिनांकाची व पदाची सेवापुस्तकातील नोंदीची साक्षांकित प्रत, बदली करण्यात आलेल्या नोंदीची सेवापुस्तकातील नोंदीवरुन माहिती, श्री.जगदाळे, वाहनचालक यांची दि.१.७.१९८४ ते २९.२.१९९२ पर्यंतची वेतन देयक नोंदणीपत्रकातील पृष्ठाची छायांकित प्रत, श्री.खारतुडे व इतर १७ यांना नवीन वेतनश्रेणी लागू केली आहे का, दुग्धशाळा पर्यवेक्षकांना रु.१६००-२६६० वेतनश्रेणी लागू करणे बंधनकारक असताना का लागू केली नाही.

वित्तविभागाच्या ३१.१०.१९९८ व दि.७.११.१९९८ च्या अधिसूचनेनुसार वेतनश्रेणी मंजूर केलेली असतानाही कार्यालयाने उक्त कालावधीची प्रत्यक्ष वेतनश्रेणी लागू केल्यामुळे अतिप्रदान केलेल्या रकमेच्या वसुलीच्या आदेशाची प्रत. पुणे दूध योजनेकडून बदलून आलेल्या दुग्धशाळा पर्यवेक्षकांना त्या दूधयोजनेमध्ये वेतनाची, पगारी सुट्ट्यांची व अतिकालिक भत्त्यापोटी दिलेल्या फरकाच्या रकमेमध्ये अतिप्रदान झालेली रक्कम वसूल केलेल्या आदेशाची प्रत. श्री.दाभाडे यांना कुशल सहाय्यक या पदोन्नतीच्या पदाची पदस्थापना करुन वेतनश्रेणी, रोजंदारीवरील २४० दिवस पूर्ण झालेनंतर नियमितपणाचे फायदे देताना लागू केली .अतिप्रदान झालेल्या रकमेच्या आदेशाची प्रत. ही सर्व माहिती १९९८, २००१, २००२ या सालातील आहे.

**अपील क्र.११४**

सन १९७९ ते १९८३ या लावधीतील २४१ व्या दिवसापासूनचे ते २.८.१९८३ पर्यंतच्या कालावधीचे ओटी व पीएचच्या न देय प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

**अपील क्र.११६**

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार पूर्वलक्षी प्रभावाची सेवेची नियमितता मिळाली असल्याने सेवेची ज्येष्ठतासुध्दा पूर्वलक्षी प्रभावाची असल्याने दि.१.१०.१९९४ च्या दिनांकाच्या कालबध्द पदोन्नतीच्या आदेशाची प्रत.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर (अपील क्र.५३+७६+४०+१६७+१७४+११५+१४७+१८२+७८+८१), श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे (अपील क्र.११४+११६), श्री.गोरखनाथ चंदू मोरे (अपील क्र.१०९+१७६) व श्री.दत्तात्रय मनोहर पाटील(अपील क्र.१६५) यांनी पुणे, सातारा व मिरज येथील शासकीय दुग्धशाळांच्या संदर्भातील माहिती मागितली होती. श्री.गोरखनाथ चंदू मोरे, श्री.दत्तात्रय मनोहर पाटील व श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे यांनी स्वत:ची वेतनश्रेणी बदलणे, न देय प्रमाणपत्र मिळणे इत्यादी संदर्भातील माहिती मागितली होती. श्री.वाडेकर यांनी त्यांच्या संदर्भातील तीच माहिती (अपील क्र.१६५) मागितली होती. तसेच स्वत:च्या संदर्भातील बदली, औद्योगिक न्यायालयाने जैसे-थे स्थिती ठेवण्याचा दिलेला आदेश असतानाही अन्य व्यक्तीला रुजू करुन घेणे या संदर्भातील माहिती मागितली होती. माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, अपुरी मिळाली, प्रथम अपिलाची योग्य ती दखल घेतली गेली नाही, अशा कारणांवरुन श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर, श्री.गोरखनाथ चंदू मोरे, श्री.दत्तात्रय मनोहर पाटील व श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

एकाच सार्वजनिक प्राधिकरणातील एकाच स्वरुपाच्या समान विषयांबाबतची ही अपिले असल्यामुळे आयोगाने उभय बाजूंशी झालेल्या चर्चेनुसार त्यांची एकत्रित सुनावणी घेतली. वेतनश्रेणी वेतन पडताळणी पथकाच्या अभिप्रायानुसार बदलून मिळावी, अतिप्रदानाच्या रकमांची काही कर्मचाऱ्यांकडून वसुली केली गेली; ऊर्वरित कर्मचाऱ्यांकडून वसुली करावी, सेवाज्येष्ठता यादी तयार करुन मिळावी, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार (सात कर्मचाऱ्यांच्या) कालबध्द पदोन्नतीची तारीख बदलून मिळावी, या स्वरुपाच्या प्रत्यक्ष प्रशासकीय कार्यवाहीच्या मागण्या या मूळ अर्जांमध्ये व अपिलांमध्ये प्रामुख्याने केल्या आहेत. कार्यवाहीचीच आपली मागणी असल्याचे अपीलकर्त्यांनीही नमूद केले. मुख्यत: माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत हे विषय येत नसले तरी त्याबाबतची कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे, असे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले.

अपिलांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

अपील क्र.१६५

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मनोहर पाटील यांचे निधन झाले आहे. मृत्यूपूर्वी त्यांनी श्री.वाडेकर यांना आपले प्रतिनिधित्व करण्यास प्राधिकृत केल्याचे श्री.वाडेकर यांनी सांगितले. वेतन पडताळणी पथकाकडून कै.पाटील यांच्या वेतनाचा निर्णय झाला आहे. वेतन पडताळणीचा आदेश, सेवापुस्तक यांची छायांकित प्रत मिळावी, अशी मागणी श्री.वाडेकर यांनी केली.

## आदेश

वेतनश्रेणी बदलण्याची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्या अनुषंगाने श्री.वाडेकर यानी मागणी केलेली कागदपत्रे द्यावीत.

**अपील क्र.७६+१६७+७८+८१**

यामधील माहिती मिळालेली असून तक्रार नसल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले. त्यामुळे सदर अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**अपील क्र.१०९+१७६+४०+१७४**

अपील क्र.१०९ मधील मुद्दा क्र.१ वगळता सर्व माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले.

दि.११.३.१९७६ ते दि.१९.८.१९७९ या काळातील अतिकालिक भत्ता व पगारी सुट्ट्या यांच्या न देय प्रमाणपत्राची छायांकित प्रत अपीलकर्त्याने मागितली होती. सर्वोच्च न्यायालयापर्यंत हा विषय गेला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने पूर्वलक्षी प्रभावाने झालेल्या वेतन निश्चितीनुसार हे प्रमाणपत्र मिळण्याची मागणी केली होती.

लेखाधिकाऱ्यांना वारंवार स्मरण देऊनही ही प्रत वेळेत दिली गेली नाही. आयोगापुढील सुनावणीची सूचना प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली, असे अपिलीय प्राधिकारी श्री.ज.अ.चौगुले यांनी सांगितले.

श्री.मोरे यांच्या संदर्भातील माहिती श्री.वाडेकर यांनी मागितली होती. सेवाज्येष्ठता यादीच्या संदर्भातील आदेशाची प्रत वगळता सर्व माहिती मिळाली, असे श्री.वाडेकर व श्री.मोरे यांनी नमूद केले. या विषयाबाबत उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपण अंमलबजावणी केली असून संबंधित कार्यवाही येत्या काही दिवसातच पूर्ण केली जाईल, अशी माहिती श्री.चौगुले यांनी दिली.

## आदेश

(१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत कार्यवाहीचा विषय नसल्याने अपील अमान्य.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित लेखाधिकाऱ्यांकडून लेखी खुलासा घेऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.१५.३.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपीलकर्त्यास आठ दिवसात ऊर्वरित माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार माहिती दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

### अपील क्र.११६

सोलापूरमधील चार, साताऱ्यामधील तीन अशा सात कर्मचाऱ्यांबाबत कालबध्द पदोन्नतीची तारीख सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बदलून देण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही, ती व्हावी, अशी मागणी श्री.वाडेकर यांनी केली. तारीख बदलल्याचे पत्र १५ दिवसांत दिले जाईल, अशी माहिती श्री.चौगुले यांनी दिली.

## आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत कार्यवाहीचा विषय नसल्याने अपील अमान्य.

अपील क्र.११४

सन १९७९ ते १९८३ या कालावधीतील न देय प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी श्री.दिलीप बाळकृष्ण गोरे यांनी केली. माहिती तयार असून हे प्रमाणपत्र १५ दिवसात दिले जाईल, असे श्री.चौगुले यांनी सांगितले.

**आदेश**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत कार्यवाहीचा विषय नसल्याने अपील अमान्य.

अपील क्र.१४७+११५

सरकारी वकिलाच्या सल्ल्याने व वरिष्ठ कार्यालयाच्या पूर्वपरवानगीने आपण श्री.वाडेकर यांच्या जागी श्री.एस.ए.बोकील यांना रुजू करुन घेतले, असे उत्तर तत्कालीन दुग्धशाळा व्यवस्थापक श्री.बी.वाय.उघडे यांनी दिले. असा कोणताही आदेश दिला नसल्याचे वरिष्ठ कार्यालयाने लेखी नमूद केल्याचे पत्र श्री.वाडेकर यांनी आयोगाला सादर केले. माहितीबाबत श्री.वाडेकर यांची दिशाभूल केली गेली, हे त्यातून स्पष्ट होते. संबंधित विषयात तत्कालीन दुग्धशाळा व्यवस्थापक श्री.बी.वाय.उघडे यांना न्यायालयाने दोषी ठरविले असून त्यांच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही चालू आहे, अशी माहिती यावेळी उभय बाजूंनी दिली.

**आदेश**

'माहिती' ची मागणी नसल्याने अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**अपील क्र. ५३ व १८२**

एकूण १८ कर्मचा-यांकडून अतिप्रदान केलेल्या रकमेची वसुली करावयास हवी होती, त्यातील १३ जणांच्या वसुलीची माहिती दिली, परंतु सहा कर्मचा-यांकडून वसुली केली गेलेली नाही, ती करावी, अशी मागणी श्री. वाडेकर यांनी केली. या सहा कर्मचाऱ्यांत ४ निवृत्त व २ मृत आहेत. त्यांच्याकडील वसुलीचे अधिकार दुग्धशाळा व्यवस्थापक कार्यालयास नाहीत, महालेखापाल कार्यालयाला आहेत, म्हणून दि. १३.२.२००८ रोजी त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविला

आहे, असे श्री. चौगुले यांनी सांगितले. आयोगापुढील अपिलांच्या सुनावणीची सूचना मिळाल्यानंतर हे प्रस्ताव पाठविले आहेत, याकडे श्री. वाडेकर यांनी लक्ष वेधले.

काल्पनिक वेतनश्रेणी संदर्भातील माहितीबाबत लेखाधिका-यांना दि. १०.१.२००७ रोजी कळविले आहे. दि. १८.१०.२००६ रोजीही जन माहिती अधिका-यांनी पुणे कार्यालयाला त्याबद्दल कळविले होते, परंतु त्याबाबतची कार्यवाही झाली नाही व लेखाधिका-यांनी अद्याप काही कळविले नाही, असेही श्री. चौगुले यांनी स्पष्ट केले. श्री. एच.एम. दाभाडे यांच्या बाबतच्या अतिप्रदान रकमेच्या वसुलीचा आदेश आता तयार असल्यामुळे त्याची प्रत त्वरित दिली जाईल, असे श्री. चौगुले यांनी सांगितले.

**आदेश**

१. अपिले अंशतः मान्य.

२. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित लेखाधिका-यांकडून लेखी खुलासा घेऊन अपिलीय प्राधिका-यांनी दि. १५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपीलकर्त्यास आठ दिवसात ऊर्वरित माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार माहिती दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

## आदेश

वरील सर्व अपिलांबाबतच्या आदेशांची पूर्तता संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी करावयाची असून त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि.२०.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा. संबंधित सर्व माहिती निःशुल्क द्यावयाची आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २८.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार<br>मु. पो. बालाजी निवास, आदर्शनगर,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम),<br>उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>बार्शी, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार यांनी १ जानेवारी २००५ ते मार्च २००७ या काळात शाखा अभियंता श्री. मोहिते यांनी रोजगार हमी योजनेमधून केलेल्या कामाच्या हजेरीपत्रकाच्या साक्षांकित प्रती मागितल्या होत्या.

आपणास मूळ अर्जाप्रमाणे माहिती मिळाली असल्याने, अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्त्याने दि. १८.६.२००८ रोजी निवेदनाद्वारे आयोगास केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. 30 .८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४० / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री रविंद्र प्रभाकर रोडी सर्वसुखीनगर,लिमयेवाडी , यतिमखाण्याजवळ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासकीय अधिकारी, डॉ.वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिष्ठाता, डॉ वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, सोलापूर | हजर |

अपिलकर्ता श्री रविंद्र प्रभाकर रोडी यांनी त्यांचे वडील श्री. प्रभाकर केशव रोडी यांच्या अनफिट सर्टिफिकेट बाबत महाविद्यालयाने दिलेल्या प्रमाणपत्राबाबत व मेडिकल बोर्डाने दिलेल्या आभिप्रायाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. वैशंपायन स्मृती महाविद्यालय, सोलापूर यांचेकडे मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चेअंती अपीलकर्त्याने माहिती मिळाली असल्याने, तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले .

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.30/०८/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नामदेव शामराव नालंदे<br>संपादक, सा.क-हा भिमा टाईम्स,<br>बारामती, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,<br>पुणे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ,<br>प्रादेशिक कार्यालय, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी (महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेचे सरचिटणीस) श्री. हनुमंत कृष्णा ताटे यांच्या सेवेसंबंधात एकूण तीन मुद्दयांची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास यापूर्वी दि. १२.१०.२००६, दि. ३१.१०.२००६, दि. १८.१२.२००७ व दि. १२.६.२००८ रोजी माहिती दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी निवेदनात नमूद केले आहे. दि. १२.१०.२००६ च्या पत्रावर 'माहिती अधिकारी' असा उल्लेख करणे अनवधानाने राहून गेले आहे. मात्र उत्तर माहितीच्या अधिकारातीलच आहे, असा खुलासा त्यांनी दि. १८.१२.२००७ च्या पत्रान्वयेही केला होता.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६१ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. तुषार देविदास झेंडे<br>मु.पो. म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>बारामती विभाग, बारामती, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | हजर |

दि. ७ सप्टेंबर २००६ रोजी बारामती-फलटण रोडवर दु.३.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत वाहतूक नियंत्रक शाखेतील पोलिसांनी वाहन तपासणीअंती केलेल्या महसुलाच्या अनुषंगाने एकूण पाच मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. तुषार देविदास झेंडे यांनी मागितली होती.

आवश्यक ती माहिती मिळाल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.१६.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाचा निर्णय जास्तीत जास्त ४५ दिवसांत करणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सध्या सदर अर्जदार यांची त्याबाबत काहीएक तक्रार नसल्याबाबत त्यांनी आम्हास त्यावेळी समक्ष आमचे कार्यालयामध्ये येवून सांगितलेले आहे. सदर अर्जदार यांनी ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी आम्ही नुकताच बारामती उपविभागाचा कार्यभार स्वीकारलेला होता व त्यांना आमचे विषयी काहीही माहिती नसल्यामुळे सदरचा अर्ज त्यांनी केलेला होता. सध्या सदर अर्जदार व आमचे संबंध दृढ झालेले आहेत, त्यामुळे सदर अर्जदार हे स्वत: आमचे कार्यालयात येवून माहिती घेऊन जातात व त्यांचा त्यावेळेचा राग मनातून निघून गेलेला आहे. यापुढे ते केव्हाही राज्य माहिती आयोगाला आमचे विरोधात अर्ज करणार नाहीत, हे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग,

डॉ. श्रीकांत परोपकारी यांच्या निवेदनातील विधान अनुचित आहे. अशा प्रकारची हमी देण्याचा त्यांना अधिकार नाही, याची जाणीव जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.८.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मिलिंद म-याप्पा मुळे<br>मु.पो.होटगी स्टेशन, ता. दक्षिण सोलापूर,<br>जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक ग्रंथालय संचालक,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | ग्रंथालय उपसंचालक,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई | गैरहजर |

सहाय्यक ग्रंथालय संचालनालयाने सोलापूर जिल्ह्यातील वाचनालयाचे प्रस्ताव कोणत्या सालापासून घेण्यास सुरूवात केली व किती प्रस्ताव कार्यालयाक डे मान्यतेसाठी आले, त्या सर्व प्रस्तावांच्या प्रती, प्राप्त प्रस्तावांपैकी किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आली व किती प्रस्ताव नाकारण्यात आले, नाकारण्यात आलेल्या प्रस्तावांचे निकष, सोलापूर जिल्ह्यातील सुरूवातीपासून ते आजतागायत प्रस्तावांना दिलेल्या मान्यता, वाचनालय दर्जा व अनुदान इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री. मिलिंद मऱ्याप्पा मुळे यांनी दोन प्रतींमध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे यांच्याकडे मागितली होती.

दि. १९.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहिती विस्तृत स्वरूपाची व जुनी असल्याने एक महिन्याची मुदत जन माहिती अधिकारी यांनी मागितली होती. अपीलकर्त्यास १९९५ पासूनची माहिती देण्यास उभय बाजूंनी त्यावेळी मान्यता दिली. त्यास अनुसरून दि.११.७.२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास सन १९९६ ते २००७ या काळातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी टपालाने पाठविली. परंतु अपीलकर्त्याने ते टपाल न स्वीकारता जन माहिती अधिकारी

यांना परत पाठविले. तसेच सदर पत्रामध्ये अपीलकर्त्यास कार्यालयात समक्ष येऊन कागदपत्रांची पाहणी करून आवश्यक त्या कागदपत्रांचीच मागणी करण्याची सूचना दिली होती, असे जन माहिती अधिकारी श्री. मु. वा. उजळंबकर यांनी आयोगाला दि. २५.८.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

अपीलकर्ता श्री. मुळे यांनी मुलीच्या नावाने ग्रंथालय प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव लोकसंख्या निकषात बसत नसल्याने संचालनालयाने अमान्य केला. त्यामुळे आकसापोटी श्री. मुळे संचालनालयास जाणूनबुजून त्रास देत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. श्री. मुळे यांनी दारिद्र्य रेषेखालील दाखला सादर करून सदर माहिती दोन प्रतींमध्ये मागविली आहे. प्राप्त प्रस्तावांची संख्या, नाकारलेले प्रस्ताव, मान्य प्रस्ताव, शासन निर्णय इ. विस्तृत स्वरूपात माहिती असल्याने त्याच्या झेरॉक्स प्रती काढून मोफत पुरविणे आर्थिकदृष्ट्या अशक्य आहे, असेही श्री. उजळंबकर यांनी निवेदनात म्हटले आहे. गेल्या दोन वर्षांतच सुमारे दोन हजार प्रस्ताव दाखल झाले असून प्रत्येक प्रस्तावाची पृष्ठसंख्या १०० ते १२५ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिकारी श्री. मु.वा. उजळंबकर यांनी नमूद केलेली कार्यालयीन अडचण लक्षात घेता माहितीचे स्वरूप विस्तृत असल्यामुळे नस्तीची पाहणी करून आवश्यक असलेली माहिती अपीलकर्त्याने घेणे हा योग्य पर्याय आहे. अपीलकर्त्याने माहिती न मिळाल्याचे आयोगास कळविले. मात्र ती आपण स्वीकारत नसल्याचे आयोगास कळविलेले नाही, हे योग्य नाही. अपीलकर्त्याच्या कृतीबद्दल साशंकता निर्माण करण्यास ते कारणीभूत ठरू शकते. तसेच माहितीच्या अधिकारात 'माहिती' मागता येईल, एकाहून अधिक प्रतींची मागणी मान्य करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. ३० .८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रामकृष्ण धोंडीबा नायकोडे<br>मु.पो. पोथरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पोथरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, करमाळा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. रामकृष्ण धोंडीबा नायकोडे यांनी ग्रामपंचायत, पोथरे येथील दफनभूमी जमाखर्च पावत्या, गावातील गटार दुरूस्ती जमाखर्च व्हौचर, मजूर पत्रक व गहू वाटप यादी, स्टँपपोस्ट किती बांधले. भैरवनाथ मंदिर शेजारील पत्र्याचे शाळेचे पाडकाम ठराव व इतर माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चेत उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. काही माहिती राहिली होती, ती विशेष अपील निर्गत कार्यक्रमदिनी दि. १८.६.२००८ रोजी पूर्ण देण्यात आली, असे उभय बाजूंनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .८.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ